MHAH190004102021

**निशाणी क्र. ४ वरील कौटुंबिक हिंसाचार कायदा २००५ अंतर्गत कलम २३ वरील अर्जावर आदेश**

१. अर्जदारांनी प्रस्तुत अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २३ अन्वये गैरअर्जदार यांचे कडून अंतरीम पोटगी रुपये ५,०००/- प्रतिमहिना मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात असे म्हणणे आहे की, अर्जदाराचे लग्न गैरअर्जदार क्र. १ याचे बरोबर हिंदुधर्मशास्त्राप्रमाणे व जाती रिवाजाप्रमाणे दि. ०९.०७.२०१२ साली मोठया थाटामाटात व संसारउपयोगी वस्तू देवून झालेले आहे. लग्नानंतर अर्जदार हि गैरअर्जदाराडे नांदायला गेली असता त्यांनी सहा महिने तिला चांगले नांदविले परंतु त्यानंतर गैरअर्जदार हे अर्जदारास शिविगाळ करणे, केस धरुन मारहाण करणे, काम होत नाही, स्वयंपाक येत नाही म्हणून अर्जदारस मारहाण करणे, उपाशी पोटी ठेवणे, कष्टाची कामे करुन घेणे इ. त्रास देत असत. दरम्यानच्या काळात त्यांना अर्जदार नं. २ पृथ्वीराज हा मुलगा झाला व तो सध्या गैरअर्जदारांकडे त्यांनी बळजबरी हिसकावून घेवून त्यांच्याकडे ठेवलेला आहे.

३. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार ही गैरअर्जदार नं. १ कडे नांदत असतांना गैरअर्जदार नं. १ याने स्वत:साठी ट्रक घेण्यासाठी रक्कम रुपये २,००,०००/- ची अर्जदारास तिचे आई वडीलांकडून मागणी करु लागला. गैरअर्जदार हे अर्जदारास पैशाच्या मागणीवरुन, घरातील कामे येत नाही, तु पसंत नाही या कारणावरुन तिचा शारिरीक व मानसीक छळ करुन तिला घराचे बाहेर हाकलून देत असत. तसेच गैरअर्जदार हे पैसे आणले तरच तुला नांदवू, नाहीतर तु येथे राहू नकोस असे म्हणून शिवीगाळ करत असत. तसेच अर्जदाराच्या चारित्र्यावर संशय घेणे, घराचे बाहेर हाकलून देणे, आई वडीलांना फोन करु देत नसत इ. त्रास देत असत. गैरअर्जदार नं. १ यास दारुचे व्यसन जोडलेले आहे. गैरअर्जदार नं. १ ते ४ यांनी दि. ०७.०७.२०१९ रोजी अर्जदारास मारहाण करुन, अंगावरील सर्व दागदागिने काढून घेवून अर्जदारास एकावस्त्रानिशी घराचे बाहेर हाकलून दिले. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, त्यांच्यामध्ये तडजोड झाल्यानंतर दोन महीने अर्जदारास चांगले नांदविले. परंतु त्यानंतर दि. १७.०१.२०२१ रोजी पुन्हा अर्जदार नं. १ च २ यास गैरअर्जदारांनी अंगावरच्या कपडयानिशी हाकलून दिले. अर्जदाराच्या आईवडीलांनी गैरअर्जदारास वेळोवेळी विनंती करुन , समजावून देखिल अर्जदारास नांदविण्यास नकार दिला. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, गैरअर्जदारांनी अर्जदारास हाकलून दिल्यापासून तिची कोणतीही सोय केलेली नाही. तसेच ती सर्वस्वी गैरअर्जदार नं. १ वर अवलंबून आहे. याउलट गैरअर्जदार यास एकत्र कुटूंबामध्ये मौजे अकोले ता. पाथर्डी येथे ०५ एक बागायती शेतजमीन

असून त्यापासून गैरअर्जदारास  वर्षाकाठी १५ ते २० लाख रूपये उत्पन्न मिळते. तसेच गैरअर्जदार यांना दुधाचे धंदयापासून महिन्याला ३० हजार रूपये उत्पन्न मिळते. गैरअर्जदार यांची अर्जदारास पोटगी देण्याची ऐपत असल्याचे कथन अर्जदाराने केलेले आहे.  तसेच गैरअर्जदार नं. १ वर इतर कोणीही अवलंबून नाही.  त्यामुळे गैअर्जदाराकडुन अर्जदारास प्रत्येकी ५,०००/- रूपये पोटगी मिळणेकामी अर्जदाराने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

४.  गैरअर्जदाराने नि.क्र.१ ते ३ यांनी नि २८ वर व गैरअर्जदार नं. ४ यांनी नि १५ वर  अर्जदाराच्या अर्जास जबाब दिला असून त्याने अर्जदाराच्या अंतरिम पोटगीच्या मागणीस सक्त विरोध केला आहे. गैरअर्जदाराने उत्तरादाखल त्याचे अर्जदारासोबत लग्न झाल्याचे मान्य केले आहे.  गैरअर्जदारांच्या म्हणण्यानुसार, अर्जदार ही लग्नांतर एक वर्षे चांगली नांदली. त्यानंतर अर्जदार नं. १ ही म्हणू लागली की, तु तुमचे बरोबर उस तोडण्यासाठी येणार नाही. त्यावेळी गैरअर्जदार नं. १ हा अर्जदारास समजावून सांगत असे की, त्याचे आईवडील वयोवृ्ध्द आहेत ते सुध्दा उस तोडतात मला सुध्दा उस तोडल्याशिवाय पर्याय नाही. तेव्हा अर्जदार नं. १ हिस राग येवून घरामध्ये विनाकारण भांडणतंटा करणे, रूसून बसणे, गैरअर्जदार नं. १ च्या आई वडीलांना उलट सुलट बोलणे, सतत माहेरी निघून जाणे अशा रितीने त्रास देण्यास सुरूवात केली. दरम्यानचे काळात अर्जदार नं. १ हिस गैरअर्जदार नं. १ पासून पृश्वीराज हा मुलगा झाला.  त्यानंतर अर्जदार नं. १ ही  गैरअर्जदार नं. १ या पुणे येथे राहण्यास जावू मी तुमच्यासोबत उस तोडण्यासाठी येणार नाही नाहीतर माझे माहेरी राहण्यास चला असे म्हणून नेहमी भांडणतंटा करत असे व माहेरी निघून जात असे. पुढे दरम्यानचे काळात त्यांना अर्णव हा मुलगा झाला. अर्जदार नं. १ हीच्या पुणे येथे जाण्याचा हट्टापायी गैरअर्जदार नं. १ हा तिला पुणे येथे घेवून गेला. दरम्यानचे काळात गैरअर्जदार नं. १ यांनी अर्जदार नं. १ चे बहिणीचे लग्नाला दिलेली रक्कम रूपये ५०,०००/-अर्जदार नं. १ हिचे आईस मागितली असता सदरची रक्कम देण्यास त्यांनी टाळाटाक केली. गैरअर्जदारांचे पुढे असे कथन आहे की, गैरअर्जदार नं. १ यांचे वडीलांचे हाताचे बोटाला कोयता लागल्यामुळे त्यांनी गैरअर्जदार नं. १ यास उस तोडण्यासाठी बोलावून घेतले. परंतु अर्जदार नं. १ ही आठ दिवसांनी परत म्हणु लागली की, मी येथे उस तोडणार नाही. गैरअर्जदाराने तिला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला परंतु अर्जदार नं. १हिस राग येवून तिने तिच्या आईस फोन करून तिच्या माहेरी निघून गेली व त्यानंतर १५ ते २० दिवसांनी गैरअर्जदारांचे घरी कोणी नसतांना द ाराचे कुलूप तोडून घरातील वस्तू , दागदागिने तसेच रक्कम  घेवून  गेली. सदर बाबत गैरअर्जदार यांनी पोलिस स्टेशनला फिर्याद  दिलेली आहे.  त्याचा राग येवून अर्जदार नां. १ हिने गैरअर्जदारांविरूध्द खोटा केसेस केलेल्या आहेत.   अर्जदार नं. १ ही स्वत: होवुन माहेरी राहत आहे.  तसेच अर्जदार नं. १ कडे १० शेळया असून  शेळी पालणाचे व्यवसायातून स्वत:ची उपजिवीका भागवते म्हणून तिस उत्पन्नाचे साधन आहे. याउलट गैरअर्जदार नं. १ हा मोलमजूरी करतो . तसेच त्याची  पोटगी देण्याची ऐपत  नाही. तसेच त्याच्या आईवडीलांची जबाबदारी त्याच्यावर आहे त्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह रद्द करण्याची मागणी गैरअर्जदारांनी केलेली आहे.

५. अर्जदारातर्फे वकील **एल. एच. लांडे** व सामनेवाला तर्फे वकील श्री. **बी. बी. माने**. यांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद तसेच अभिलेखावरील दस्त यावरून पुढील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले असून त्यावरील माझे कारणांसहीत निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत :-

| **अनु. क.** | **विचारार्थ प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अर्जदार हि महिला कौटुंबिक हिंसाचार संरक्षण कायदा, २००५ अंतर्गत अंतरिम पोटगी मिळणेसाठी पात्र आहेत काय ? | ... होय, अर्जदार नं. १ हिस प्रतिमहा रक्कम रूपये १००० /- व अर्जदार नं. २ यास प्रतिमहा रक्कम रूपये १,०००/- |
| २) | आदेश काय? | ....... अर्ज अंशत: मंजूर करण्यात येतो. |

**कारणमिमांसा**

६. अर्जदाराने तिच्या अर्जाच्या पृष्ठर्थ अर्जासोबत मौजे अकोला येथील गट नं.५१/१ चा 7@12 उतारा , अर्जदाराचे मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्र अभिलेखावर दाखल केले आहे. तसेच सामनेवालाने त्याच्या म्हणण्यापृष्टयर्थ मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्र तसेच मुलगा पृथ्वीराज याचे शाळेचे प्रगतीपत्रक, बोनाफाईड सर्टीफिकेट अभिलेखावर दाखल केलेले आहे .

**मुद्दा क. १ व २ करिता :-**

७. महिला कौटुंबिक हिंसाचार संरक्षण कायदा, २००५ अंतर्गत अंतरिम पोटगी मिळणेसाठीचा अर्ज निकाली काढतांना न्यायालयाने अर्जदाराच्या अर्जाचा खोलवर विचार न करता अर्जदार हे प्रथमदर्शनी (prima-facie case) अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहेत का हे पाहणे आवश्यक आहे. तसेच विशाल दामोधर पाटील वि. विशाखा विशाल पाटील २००९ सि.आर.एल.जे. १०७ (बॉम्बे) याप्रकरणात न्यायालयाने अंतरिम पोटगी मिळणेसाठी अर्जदाराने वेगळा अर्ज दाखल करणे आवश्यक नसल्याचे म्हटले आहे. त्यामुळे केवळ अर्जदाराने केलेल्या अंतरिम अर्जातील कथनाचा विचार न करता मुळ अर्जातील कथने देखील विचारात घेणे आवश्यक आहे. तसेच अभिलेखावरील कथने व दस्तावरून प्रथमदर्शनी अर्जदारावर गैरअर्जदाराने कौटुबिंक हिंसाचार केला असे सिध्द केले आहे का हे पाहणे आवश्यक आहे.

८. अर्जातील कथने विचारात घेता अर्जदाराने तिच्या अर्जामध्ये गैरअर्जदाराने तिचा मानसिक व शारिरिक छळ केला असे नमूद केले आहे. तसेच दिनांक १७.०१.२०२१ गैरअर्जदार यांनी एकमिलाफी होवून

पैशाच्या मागणीवरून अर्जदार नं. १ हिस मारहाण करून अर्जदार नं. २ सह घराबाहेर हाकलून दिले. तसेच अर्जदाराने गैरअर्जदार तिस मारहाण करत असे व शिवीगाळ करून शारिरिक व मानसिक छळ केला असे देखील अर्जामध्ये नमूद केले आहे.

०९. जरी गैरअर्जदाराने अर्जदाराचे कथनास विरोध केला असला तरी अर्जदार ही तिच्या माहेरी राहत असल्याच्या कथनास गैरअर्जदाराने विरोध केलेला नाही. तसेच गैरअर्जदाराचे कथनात त्याने अर्जदारास स्वत:ची उपजिवीका भागवणेसाठी सहाय्य करत असलेबाबत रक्कम दिल्याचे देखील नमूद नाही. त्यामुळे अर्जदार ही गैरअर्जदारासोबत राहत नसल्याचे व गैरअर्जदार अर्जदारास तिची उपजिवीका भागवणेसाठी सहाय्य करत नसल्याचे अभिलेखावरील दस्तावरून व अर्जावरून स्पष्ट होते. अर्जदार ही गैरअर्जदाराची पत्नी असल्याचे गैरअर्जदाराने मान्य केले आहे. सदर कृती सुध्दा अर्जदारास मानसिक त्रास देणारी व कौटुंबिक हिंसाचाराच्या संज्ञेमध्ये बसणारी आहे. तसेच अर्जदार नं. २ हा त्यांचा मुलगा असून अर्जदार नं. १ सोबत असल्याचे गैरअर्जदाराने कोठेही नाकारले नाही. त्यामुळे गैरअर्जदार हा पती व वडील या नात्याने अर्जदारांस आर्थिक सहाय्य पुरवण्यास बांधील आहे.

१०. अर्जदाराचे अर्जातील कथनाचा विचार करता अर्जदार ही माहेरी राहत असल्याचे निष्पन्न होते. कोणतीही विवाहीत महिला कोणत्याही कारणाशिवाय आपल्या माहेरी राहायला जाणार नाही. तसेच अर्जदाराने दाखल केलेला अर्ज, त्यासोबत असलेले प्रतिज्ञापत्र, दस्तावेज ,दाखल केलेली कागदपत्र या बाबींचा विचार करता प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार झालेला आहे.

११. अर्जदाराने शपथेवर कथन केले आहे की, गैरअर्जदारांस एकत्र कुटूंबामध्ये मौजे अकोले येथे ०५ एकर बागायती शेतजमीन असून त्यामधून गैरअर्जदारांस १५ ते १६ लाख रूपयांचे उत्पन्न मिळते. सदर कथनापृष्टयर्थ अर्जदार नं. १ हिने शेतजमीनीचे 7@12 उतारा अभिलेखावर दाखल केलेला आहे. सदर उता-याचे अवलोकन केले असता सदर उता-यावर गैरअर्जदार नं. १ च्या वडीलांचे नाव असल्याचे दिसून येते. म्हणजेच सदर शेतजमीनीमध्ये गैरअर्जदार नं. १ याचा हिस्सा असून त्यामधून तो निश्चितच काहीतरी उत्पन्न मिळवित असेल. त्यामुळे शेजमीन व त्याबाबचे उत्पन्नाची बाब संपूर्णपणे खोटी आहे असे म्हणता येणार नाही. तसेच अर्जदार नं. १ हिने गैरअर्जदारांस दुध धंदयापासून महिन्याला ३० हजार रुपये मिळवतात असे कथन केले आहे. सदर कथनापृष्टयर्थ अर्जदार नं. १ हिने जरी काही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नसला तरी तिने सदर बाब शपथेवर कथन केलेली आहे. तसेच गैरअर्जदारांनी देखिल सदर बाबी कोठेही नाकारलेल्या नाहीत. यावरून गैरअर्जदाराची परिस्थीती सधन असल्याचे दिसून येते व तो शारीरीकरित्या सक्षम असून अर्जदार हिस पोटगी देण्यास सक्षम असल्याचे दिसून येते. पती व वडील या नात्याने गैरअर्जदार याच्यावर अर्जदार नं. १ व अर्जदार नं. २ च्या पालनपोषणाची नैतीक व कायदेशीर जबाबदारी असल्यामुळे अर्जदारांस अंतरिम पोटगी देणे न्यायोचीत

होईल. अर्जदारांनी केलेली अंतरिम पोटगीची मागणी, जिवनाश्यक वस्तुंच्या वाढलेल्या किंमती व अर्जदाराला लागणारा खर्च या सर्व बाबींचा विचार करता, तसेच गैरअर्जदाराची आर्थिक परिस्थीती व गैरअर्जदारावर मुलगा पृथ्वीराज याचे शिक्षणाची, पालनपोषणाचा जबाबदारीचा विचार करता, अर्जदार नं. १ हिस गैरअर्जदार नं.१ याच्याकडून प्रतिमहिना रू. १,०००/- व अर्जदार नं. २ यास गैरअर्जदार नं. १ कडून प्रतिमहिना रू. १,०००/- अंतरिम पोटगी देणे न्यायोचीत होईल. करीता मी मुद्दा क्र. १ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदवून खालील प्रमाणे आदेश करते :-

**<u>आदेश</u>**

(१) नि.क्र. ५ वरील अंतरीम अर्ज अंशतः मंजूर करण्यात आला.

(२) गैरअर्जदाराने अर्जदार क्र. १ हीस दरमहा रू. १,०००/- व अर्जदार नं. २ यास दरमहा रू. १,०००/- अशी एकूण २,०००/-( अक्षरी रूपये दोन हजार रूपये मात्र) अंतरीम पोटगी म्हणून अर्ज दाखल तारखेपासुन ते मूळ अर्ज निकाली लागेपर्यंत द्यावेत.

(३) कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २४ अन्वये या आदेशाची प्रत उभयपक्षकारांना विनामुल्य पुरविण्यात यावी.

सही/-
(व्ही. बी. डोंबे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, शेवगाव,

दि. ११/१२/२०२३